


# स्नेहबंध

जून २०२०

मराठी भाषिक मंडळ, टोरांटो
MARATHI BHASHIK MANDAL TORONTO

# संपादकीय

नमस्कार मंडळी

२०२० सालचा  पहिला स्नेहबंध अंक आपल्या हातात ठेवताना अतिशय आनंद होत आहे.

हे वर्ष तसं एकूण विलक्षणच म्हणायला पाहिजे. एका सूक्ष्मातिसूक्ष्म निर्जीव गोष्टीने गेले ४-५ महिने संपूर्ण जगाचा ताबा घेतलाय आणि आपल्याला माणूस एक सर्वश्रेष्ठ प्रजाती असल्याच्या गोड़ गैरसमजातून खाडकन भानावर आणलंय. माणसाची दिवसेंदिवस वाढत जाणारी चढ़ेल वृत्ती आणि निसर्गाच्या ऱ्हासाबद्दलची बेपर्वाई पाहता हे होणारच होतं कधी ना कधी; आणि ते झालंच. आता हळूहळू माणूस भानावर येतोय. आपलेच सगेसोयरे आणि मित्रमंडळी डोळ्यासमोर हां हां म्हणता काळाच्या पडद्याआड जाताना हतबलतेने पाहावं लागल्यामुळे आपणही  इतरांप्रमाणे निसर्गाचाच एक भाग आहोत ह्याचं स्मरण त्याला झालंय आणि इथून पुढे प्रत्येक पाऊल विचारपूर्वक उचललं जाईल अशी आशा आपण करूया.

ह्या थोड्याशा उदास आणि त्रिशंकू मनस्थितीतही आपल्यातल्या लेखक मंडळींनी ह्या अंकासाठी छान छान लेख, कविता लिहिल्या आहेत आणि मुख्य म्हणजे आपल्या बच्चे कंपनी ने खूप सुंदर चित्रं सुद्धा काढली आहेत. ह्या अंकाचं ते एक मोठं वैशिष्ट्य म्हणावं लागेल. आपण ह्या सगळ्याचा मनापासून आस्वाद घ्याल अशी आमची खात्री आहे. हा अंक आपण वाचा आणि इतरांनाही त्याबद्दल सांगा. यातून स्फूर्ती घेऊन पुढच्या अंकात आपण आपले लिखाणही पाठवू शकता.

लोभ आहेच, तो वृद्धिंगत व्हावा ही सदिच्छा...

शुभदा वकनल्ली

संपादिका

**विशेष सूचना - ह्या अंकात प्रकाशीत झालेल्या साहित्यातील मते ही साहित्यिकांची असून त्या मतांशी संपादक किंवा कार्यकारिणी मंडळ  सहमत असेलच असे नाही याची कृपया नोंद घ्यावी. कॉपीराईट खात्री ही साहित्यिकांची जबाबदारी आहे. संपादक किंवा कार्यकारिणी जबाबदार नाही.**

# नमो नमस्ते!

माहित नव्ह्ते; कळले आता,
वुहानी वारा किती विषारी.
'हान' नदीतीरा जन्म घेउनी,
जगात आणिली महामारी.

माहित नव्ह्ते; कळले आता,
वुहान विषाची ओळख खरी;
नासिकेद्वारे विषकण जाता,
होई बाधा; बेईलाज बिमारी.

माहित नव्ह्ते; कळले आता,
का, जगी भावे नमो नमस्ते!
सूक्ष्म पाहुणे घरदारी येता,
हस्तांदोलनही रास्त नसते!

माहित नव्हते; कळले आता,
का, भूत झाले येणे जाणे.
लक्ष्मण रेषा कशी लांघता?
हात दाखवूनी अवलक्षणे!

माहित नव्ह्ते; कळले आता,
विषाणु प्रतिबंधक कोण ते;
कोव्हिड-२ चे अदृष्य हाता;
सारा अतिदूर! करा नमस्ते!

माहित नव्हते; कळले आता,
संजीवनी कशी शोधणे.
श्री. हनुमान परतावा आता,
तोवर सर्व घरी राहणे.

# उमेश अणावकर यांच्या कविता

## श्रावण सरला...

पानात तुझे रंग वेचताना
रानात तुझे गंध शोधताना
कुठून मग दरवळ
रंग हिरवा ओला
स्मरे तो प्रितीचा
श्रावण पहिला...

हातात तुझे स्पर्श शोधताना
कानात तुझे गुज ऐकताना
हृदयात मग कळ
चिंब थंड नी ओला
स्मरे तो प्रितीचा
श्रावण पहिला...

जनात तुझा वास शोधताना
जनमनात तुझा हव्यास सोसताना
नयनात मग पाणी
काळ देऊनी गेला
प्रितीचा श्रावण
अधुराच सरला...

---

## चातका रे आता (चारोळी)

चातका रे आता, किती पाहशील वाटा ?
मेघ लागले दाटू, बघ देशी च्या घाटा...
परदेशी गावी आता, हूंदका ही गिळे ना
देशी बरसल्या थेंबांचा, कुणी पाजावा साठा..
चातका रे आता, किती पाहशील वाटा !

---

## चुंबन (चारोळी )

मज बिलगून गेले मिठीत क्षण ते,
पावसात चिंब न्हाताना,
अन् देउन गेले ओठांवरती
ओले ते चुंबन, डोळ्यात पाहताना !

## मी पाहिलेला पाऊस

पाऊस गडांचा,सुंदर कडांचा
निसरड्या चढांचा, तांबड्या वाटांचा
गार वाऱ्याचा,भेदणाऱ्या ढगांचा
डोंगर माथ्यांचा पाऊस
पाऊस दऱ्यांचा !

पाऊस पाण्याचा, गार झऱ्यांचा
वाहत्या ओढ्यांचा, तुडूंब नद्यांचा
शार लाटांचा, धबाक धबधब्यांचा
रपाक गारांचा पाऊस
पाऊस धु धु धुक्याचा !

पाऊस पानांचा, दवल्या फुलांचा
सुवासीत रांनांचा, रांन भाज्यांचा
बिजांचा अंकुरांचा
ओल्या मातीचा पाऊस
पाऊस तरव्यांचा !

पाऊस भाकऱ्यांचा, वर पिठलं झूणक्याचा
लसुण चटणीचा, कुळथाच्या पिठीचा
बेगमीच्या पापडांचा ,मुरल्या लोणच्याचा
चिंबोऱ्यांचा पाऊस
पाऊस शेंगटांचा !

पाऊस कळलेला, मनात साचलेला
पाऊस ... पाऊस मी पाहिलेला !

---

## कोरोना - मित्र की शत्रू

रोज माणसांची ओझं वाहणारी शहरं , दिनरात सुसाट वेगाने पळणारे रस्ते, ऑफिस शाळा मिटिंगच्या वेड्या शर्यतीत धावणारी आई-बाप मुलं, सारेच दमलेले थकलेले... सोबत असले तरी दुरावलेले.... अनोळखी आणि एकाकी....
रिमोटचा pause बटन दाबला की TV च जग जस थांबतं तस करोना च्या एका आक्रमणाने हे सारेच कुठलाही तर्कवितर्क तक्रार न करता शांत विसावले आहेत. करोना मुळे अचानक झालेला हा बदल, हा चमत्कार, वरदान आहे का शाप...या प्रश्नाचे उत्तर अजूनही काही केल्या सापडत नाही.

नेहमी locked राहणाऱ्या भिंती lockdown मुळे एकाएकी जिवंत वाटू लागल्या, घरातल्या खोल्यां खोल्या बोलू लागल्या. संपत चाललेल्या, संवादाला हरवलेल्या नात्यांना जणू नवीन पालवी फुटली आहे. कितीतरी वर्ष गुदमरलेल्या निसर्गाने मोकळा श्वास घेतला आहे. दिवाळी-दसरा असल्यासारखे घरात मेजवानी, गोंधळ आणि बेमुदत सुट्ट्यांची मज्जा सुरू आहे. देवाने सुद्धा social distancing या संधीचा फायदा घेत थोडा ब्रेक घ्यायचे ठरवले. बॅटरी फुल recharge करायची, थोडी विश्रांती घ्यायची, data अपडेट करायचा आणि नंतर परत यायचं म्हणून त्याने सुद्धा देवळांची दारं बंद केली आहे. अनवधानाने झालेले हे सारे बदल स्वप्नात मागितलेल्या इच्छा वरदानासारखे वाटू लागले आहेत.

रिमोटचा PAUSE संपला आणि PLAY दाबला की एका भयानक सत्याशी सामना होतो. या अदृश्य विषाणूने मृत्यूचा कसा थैमान घातलं आहे याचे भान येते. आजचा दिवस गेला, पण उद्याचा कसा जाईल या भीतीने चित्त अस्थिर होते. आपल्या जवळच्या माणसांना शेवटची मिठी मारता न यावी यापेक्षा अधिक दुःखी अवस्था काय असेल. तेव्हा अशा या अज्ञात अदृश्य करोनाला मित्र म्हणावे की शत्रू, यांचे आभार मानावे का त्याचा द्वेष करावा या प्रश्नाने डोक्याला चक्रावून सोडलेआहे. या प्रश्नात अनेक कूट प्रश्न आहेत आणि त्याच्या उत्तरात, अनेक गुढ उत्तरे आहेत जी तुमची तुम्हाला आणि माझी मला शोधायची आहेत. चला तर मग... self isolation करूया, self quarantine करूया आणि अंतर्मुख होऊन या प्रश्नाचे उत्तर शोधू या.

---

झाली इजा आसवांना
आता ते दिसत नाही
कितीही रक्तस्त्राव झाला
तरी ते इथे फिरकत नाही

भूतकाळात डोकावून पाहिलं
मीच मला ओळखत नाही
आर पार बदललो इतका
मलाच मी सापडत नाही

इडा पिंगला नाडी चालते
श्वासोश्वास हा थांबत नाही
हृदयाचे ठोके ऐकू येतात
मग जिवंत का वाटत नाही

नव् युगाची नाती कोरडी
क्षणभर सुद्धा जगत नाही
मैत्री यारी प्रेम दोस्ती
पूर्वीसारखी टिकत नाहीत

पावसानेही लावला मुखवटा
खरा खोटा कळत नाही
दरवर्षी बदलतो गणित
पाऊस कोडे सुटत नाही

रंगमंचावर भेटले अनेक
तो मात्र कधी भेटला नाही
शोधु परत पुढच्या जन्मी
रंगमंच खेळ संपत नाही

---

# रोहित वडके यांच्या कविता

## मराठी कविता

लिंबोणिच्या झाडामागील चंद्रास कसं विसरू,
अंगणात खेळणारा होतो मी वासरू,
लाडका गुंड्या सर्वांचा उचलून न्यायचे सारे,
आईच्या स्पर्शाची वाट पाहत आता मोजतो तारे !

नात्यांची ओढ आणि त्यांना जगण्याची एक वाट,
ऐका आपल्या हृदयात पुन्हा मुंबईच्या समुद्राची लाट,
भातुकलीच्या खेळात हरवले राजा आणि राणी,
शब्दात कोंडली ह्या जिवाची कहाणी !!

————————————————————————————

स्वप्नात येतेस रोज माझ्या,
असशील नक्की कोणी अप्सरा किंवा परी,
येशील ना भेटायला लवकर,
कहाणी लिहू प्रेमाची लय भारी!

तुला दीपिका म्हणू की देवसेना,
प्रेमाची भाषा कोणी केल्याशिवाय समजेना,
प्रेमपत्र कसे लिहू, व्हाट्सअँपच्या ह्या जमान्यात,
स्नॅपचाट वर नाही, प्रेम भेटल्यानी होईल प्रत्यक्षात !

सखी सारखी लाड करेल अशी माझी ताई,
जिचा मी जीव की प्राण, सासू नको, म्हणशील ना तिला आई,
सर्वात जास्त तुझ्यावर माया करतील, असे हे माझे बाबा,
ज्यांनी मला घडवलं, तेच देतील तुला माझा ताबा !

आपल्या प्रेमाला साक्ष नाही, नशीबाचा आपल्याला होकार नाही,
मी तुझ्यावर किती प्रेम करतो,हे तुला कधीच कळले नाही,
मी तुझ्यावर किती प्रेम करतो, हे तुला कळणार कधी,
अबोल वर्ष थांबलो तुझ्यासाठी, माझ्या जीवनात तू येशील कधी !!

## हिंदी कविता

मेरे नन्हे कदमों को जिसने पर बना दिया,
उस माँ से तूने क्यों दूर जहाँ दिया,
जिसने मुझे गिरकर भी उठना सिखाया,
मुझे जाते देख उसने कायनात को अश्कों से भिगाया,
कहती है वो, क्या तुम कभी लौट आओगे,
मै तो वहीं हूँ आज भी, दूर भला, पर अपने दिल में पाओगे,
जिसके मरहम से हाथों का मेरे नैना करें पीछा,
मेरी बचपन की यादों से जिसने सारा आँगन सींचा,
सपने तो बहुत थे देखे उसने मेरे लिए,
माँ तुझे अब सपनों में ही मिलूँ ऐसे क्यों ख्वाब दिए,
आहट होती जब मेरी, वो सहमी आँखों से दुआएँ देती,
सामने आ जाऊँ जो वो कहे काश किस्मत से तुझे छीन लेती !

————————————————————————————

इंतजार रहेगा सदा उस दीवाने का,
जिसने प्यार मुझे सिखाया,
खुली जुल्फों तले सर रखे,
जिसने एक हसीन ख्वाब मुझे दिखाया !

वो ना जाने क्यूँ एक दास्ताँ दन गया,
उडती रेत सा उडकर एक एहसास रह गया,
किसे कहूँ मैं आज भी वहीं रुकी हूँ,
जिंदा हूँ पर मेरी खुशबू वो ले गया !

कैसी आरज़ू ये दिल दे गया,
चाहती थी जिसे वो रुह ले गया,
रूठें भी कैसे उस परिंदे से,
सब पा कर भी वो घोसला वीरान रह गया,

आंखें बंद करूँ तो वो अफसाना दिख जाए,
मै लौट आउँगा कहकर उसके नैना भीग जाएँ,
इज़हार कैसे करूँ इस हसीन पल मे,
सपनों मे खोई ये पलकें काश बंद ही रह जाएँ !!

# परप्रांतात तुम्ही "मराठी" असल्याची लक्षणे

**- प्रणिता भगत कौर**

१. तुमच्या make up किट मध्ये जाई काजळ आणि पॉड्स talcum पावडर नेहमी असणे (मी भोपाळ मध्ये शिकायला असताना माझ्या समोरच्या हॉस्टेल रूम मध्ये राहणारी मैत्रीण नागपूरची मराठी आहे हे मला तिच्याकडे असणाऱ्या जाई काजळ वरून उमगलं).

२. तुमच्या घरात बाकी खायचे  प्यायचे जिन्नस नसले तरी थालीपीठ भाजणी हमखास असणे (थालीपीठाला महाराष्ट्राचे स्टेट फूड जाहीर करण्यात यावे ह्यासाठी मी लवकरच एक पेटिशन टाकणार आहे).

३. कुठल्याही शहरात गेलात तरी सर्वप्रथम, "वडा पाव" कुठे मिळतो हे शोधणे. (तिथे तो खाऊन झाल्यावर कसं त्याची टेस्ट ऑथेंटिक नाही हे कळवळून घरच्यांना सांगणे).

४. Social नेटवर्क वर "अमुक तमुक शहरात स्थायिक असलेले मराठी" हा ग्रुप शोधून तो जॉईन करणे,

५. ह्या ग्रुप वर महाराष्ट्रात असताना कधीही celebrate न केलेले सण, कधीही न केलेले पदार्थ ह्यावर चर्चा करणे (ओला नारळ कुठे मिळतो? झुणका कसा करायचा? विळी वापरतात का इथे? वगैरे वगैरे ).

६. ह्या ग्रुप वर ही  तुम्ही मूळचे कुठले? हा प्रश्न विचारणे, त्या मुळाचे उत्तर सापडले, कि त्या शहराचा वेगळा ग्रुप बनवणे म्हणजे पुणेकर, इंदोरी, नाशिककर, कोल्हापुरी इत्यादी.

७. महाराष्ट्रात असताना सगळ्यांशी मुद्दामहून  हिंदी आणि मराठीत संवाद साधणारे आता सम मराठी शोधून त्यांच्याशी आवर्जून मराठीतच गप्पा मारणे (संवाद somewhat असा सुरु होतो "अय्या, तुम्ही मराठी का? तरीच म्हटलं इथे मी मराठी कसा काय ऐकलं? कुठून आहात तुम्ही? कधीपासून आहात इथे? हो हो भेटूया ना नक्की. तेवढाच home sickness कमी होईल. नंबर सांगताय ना?") बस्स, ह्यानंतर फोन नाही की भेट नाही.

८. तुटकी फुटकी हिंदी असणे (ह्याला काही अपवाद आहेत म्हणा, पण खूपच कमी. MBA करत असताना आमची ५ जणांच्या ग्रुप ची ट्रिप सव्वा महिन्याकरिता केरळ ला गेली होती. पेरियार ला असता एकदा डिनर साठी गेलो होतो सगळेजण. आमच्या मागच्या table वर बसलेली फॅमिली मराठी हे त्यांच्या हिंदी वरून ओळखलं - अर्रे मै कबसे बोंब मार राहा हूँ कि भात वाढो, भात वाढो करके. तुम कायको भात नाही वाढ रहे?!!!

९. कधी कुठे हासभास नसताना सम मराठी दिसले कि प्रचंड खुश होणे.

१०. दर वेळी भाजीपाला विकत घेताना भाज्यांची मराठी नावे घेऊन भाजीवाल्याला confuse करणे (तुम्हारे पास वोह चवळी की पालेभाजी नाही है क्या?)

मी बरेच वर्ष पंजाब मध्ये स्थायिक होते. एक हिंदी वगळल्यास मीही कुठल्याच लक्षणाला अपवाद नाहीये अजून!! तुम्ही आहात का?

ता.क :- हा लेख लिहिण्याचा हेतू मार्मिक असून कुठल्याही समाजाच्या घटकाला कमी लेखणे, त्यांचा अपमानास्पद उल्लेख करणे हा नाही.

================================

**गायत्री गद्रे**

# लोकमान्य टिळकांना पत्र

पत्र लिहिण्यास कारण की, गणेशोत्सव सार्वजनिक करण्यासाठी तुमचे आभार मानायचे होते. लहानपणी दर वर्षी तुमच्या पुण्यतिथीच्या भाषणात हे सांगून सुद्धा वर्षानुवर्षे हा सण साजरा करतांना, तो तुम्ही सुरु केलाय ही गोष्ट कुठेतरी विस्मरणात गेली होती. पण घरापासून हजारो मैल दूर राहतांना, एक दिवसासाठी का होईना, ते सगळं पुन्हा एकदा उपभोगायला मिळालं आणि तुमची प्रकर्षाने आठवण आली

भारतात आता या सणाने काय रूप घेतलंय ते मी नं बोललेलंच बरं. पण लोकांना एकत्र आणून जनजागृती करण्यासाठी सव्वाशे वर्षांपूर्वी तुम्ही सुरु केलेल्या या सणाने आता विश्वरूप घेतलंय. सुमारे ८ देशातील वेगवेगळ्या लोकांशी बोलल्यावर मला एका गोष्टीची खात्री पटली की तुम्ही लावलेल्या त्या एका रोपट्याच्या बिया आता जगभर पसरल्या आहेत. अगदी ऑस्ट्रेलिया पासून ते फ्रान्स मधल्या एका छोट्याश्या गावापर्यंत आणि middle east मधल्या Bahrain पासून ते अमेरिका आणि कॅनडातल्या सगळ्या शहरांपर्यंत, जगाच्या कानाकोपऱ्यात हा सण तिथल्या मराठी लोकांना एकत्र आणतोय. कुठे तिथल्या देवळात, कुठे मराठी मंडळात तर कुठे घरगुती गणपतीचं पुढे झालेल्या सार्वजनिक रूपात, तो अखंडपणे साजरा होतोय. कोणी मराठी ऐकायला, बोलायला मिळेल म्हणून जातात तर कोणी मुलांना आपल्या भाषेची, संस्कृतीची ओळख राहावी म्हणून, कोणी या निमित्ताने मित्र मंडळींना भेटायला मिळेल म्हणून जातात तर कोणी नवीन ओळखी होतील म्हणून, कोणी नटायला मिळतं म्हणून जातात, तर कोणी भारतीय वेशात नटून आलेल्यांना बघायला मिळतं म्हणून जातात, एकटे जीव त्यानिमित्ताने चांगलं जेवण मिळेल म्हणून जातात तर कोणी ढोल ताशावर नाचायला मिळेल म्हणून जातात. कोणी त्या निमित्ताने आपली संस्कृती त्या देशातील अभारतीय लोकांना दाखवायची संधी म्हणून जातात तर कोणी फक्त मोदक खाण्यासाठी.

पण खरं सांगू का, कोणी काहीही सांगितलं तरी खरं म्हणजे सगळे घरच्या आठवणीने हळव्या झालेल्या मनावर फुंकर मारण्यासाठी जातात. news मध्ये, social media वर आणि वारंवार घरी होणाऱ्या विडिओ कॉल्स मध्ये जसा गणेशोत्सवाचा माहोल बघायला, ऐकायला मिळायला सुरुवात होते तसं कितीही नाही म्हटलं तरी मनात आठवणींचं काहूर माजतं आणि डोळ्यांच्या कडा ओलावतात. गणपती ची ती मजा, तो नॉस्टॅल्जिया पुन्हा पुन्हा अनुभवण्यासाठी जातात आणि आपल्या मातीशी नाळ जोडून ठेवण्याच्या प्रयत्नपोटी जातात.

तसं म्हटलं तर गणपती हा देव. पण त्याला देव्हार्यातून जनसामान्यात आणून तुम्ही त्याला सगळ्यांचं लाडकं दैवत बनवून टाकलंत. कडक सोवळ्यातून बाहेर काढून त्याला कधीही न रागावणारं असं मैत्रीपूर्ण रूप दिलंत. कदाचित हेच कारण असेल की बाकीच्या देवांसारखी गणपतीची आम्हाला भीती वाटत नाही, तर त्याच्याबद्दल वाटतं ते फक्त अपार प्रेम. उगाच नाही लहान मुलांना बाप्पा त्यांचा जवळचा मित्र वाटतो आणि आपण सगळेच त्याचा बाप्पा असा एकेरी उल्लेख करतो.

थोडक्यात सांगायचं तर, हा एक अनुभव मी काय सांगतेय हे समजावण्यासाठी पुरेसा होईल. काही वर्षांपूर्वी एक डॉक्टर अमेरिकेच्या St. Louis या शहरात आला. आल्या दिवसापासून त्याची मराठी कुटुंबांशी ओळख होती, एका मराठी कुटुंबाकडून जेवणाचा डबाही मिळत होता. असं असूनही तिथे येऊन ६-७ महिने झाल्यावर जेव्हा तो तिथल्या मराठी मंडळाच्या गणेशोत्सवाला गेला

तेव्हा फक्त रडायचाच बाकी होता. मराठी ऐकून आणि भारतीय वेशातील लोक आपल्या आजूबाजूला बघून काय वाटतं हे कुठल्याही शब्दात सांगणं केवळ अशक्य. कुठलंही पोलिटिकल correctness चं बंधन नं ठेवता आणि cultural references नं समजावता बोलायला मिळणं आणि ते ही मातृभाषेत, याचं महत्व हे भारताबाहेर राहतांना अशा सार्वजनिक समारंभात गेल्यावर कळतं.

या सगळ्या लोकांशी बोलतांना मला एक गोष्ट जाणवली, याची तयारी करायला विदेशात राहणारे मराठी लोक रात्रीचा दिवस करून झटतात. दिवसा नोकरी धंदा सांभाळून रात्री उशिरा जागून त्याची तयारी करतात. सोप्पं नसतं, विदेशात जिथे मदतीला फार कोणी नाही तिथे, असा मोठ्या प्रमाणावरचा समारंभ साजरा करणं. मग इथे असलेले लोकंच एकमेकांचं कुटुंब बनतात. कोणी decoration ची जबाबदारी घेतं तर कोणी उकडीच्या मोदकांची जबाबदारी ताकदीने पेलतं. उत्साहाने शनिवार रविवारी खपून मुलांचे वेगवेगळे कार्यक्रम बसवतात, स्वतःच्या  कला सादर करतात. त्यांच्यासाठी तो कलेच्या देवतेला अर्पण केलेला एक प्रकारचा नैवेद्य असतो. पण बाप्पाचा सण म्हटल्यावर आपोआपच उदंड उत्साह अंगात संचारतो. आपल्या समाजासाठी, आपल्या लोकांसाठी काम केल्याचं समाधान मिळतं.

मी जेव्हा Melbourne च्या गोखले मावशींशी बोलले तेव्हा ही गोष्ट प्रकर्षाने जाणवली. ५० वर्षांपूर्वी बाप्पाच्या फोटोची पूजा करून सुरु केलेला गणेशोत्सव आज ५०० पेक्षा जास्त लोकांसाठी एक हक्काचा सण झालाय. जेवढ्या हक्काने लोक सणात सामील होतात तेवढ्याच हक्काने कामेही वाटून घेतात. सगळे पदार्थ घरी बनवलेलेच असावेत, विकत काहीही आणायचं नाही असा शिरस्ताच आहे त्यांचा. पण येणाऱ्यांची संख्या जशी वाढत गेली तशी मदत करणाऱ्यांची पण. लोक घरून वेगवेगळे पदार्थ बनवून आणतात, बायका उत्साहाने मोदक करू लागतात.  मावशींच्या शब्दात सांगायचं तर "मुद्दाम काही केलं नाही, बाप्पाच्या कृपेने सगळं होत गेलं. कधी कोणाला सांगितलं नाही, हे कर, ते कर." दुसऱ्या पिढीने पण हे सगळं आनंदाने सुरु ठेवलं, आणि आता तिसरी पिढीही तेवढ्याच उत्साहाने जबाबदाऱ्या घेऊ लागली आहे. या सगळ्यातून भेटलेले लोकच आता नातेवाईकांपेक्षा जवळचे वाटायला लागले आहेत, आणि मैत्रिणी बहिणींसारख्या

गणेशोत्सवाची जगभरातली वेगवेगळी रूपं शोधतांना, मला भेटला टोरोंटो मधला Dean. धर्माने ख्रिश्चन, भाषेने अमराठी. पण पुण्यात लहानाचा मोठा झाल्याने लहानपणापासून गणेशोत्सव त्याच्या आयुष्याचा एक अविभाज्य भाग! २ वर्षांपूर्वी पुण्याहून टोरोंटो ला आलेल्या Dean ने पहिल्या वर्षापासूनच नवीन घरी गणेशोत्सव साजरा करायला सुरुवात केली. त्याच्या मते बाप्पाच्या सणात मोठा भाग आहे - संस्कृती, आनंद, खाण्याचे निरनिराळे पदार्थ, चैतन्य, आप्तस्वकीयांसोबत आनंदात घालवलेला वेळ, मजा मस्ती असं बरंच काही, जे धर्मापलीकडचं आहे. थोडक्यात सांगायचं तर हा सण सकारात्मकता साजरी करतो. बाप्पा त्याच्यासाठी एवढा जवळचा होता, की कॅनडासाठी बॅग भरतांना त्याने सगळ्यात आधी दगडूशेठ गणपतीची एक छोटी मूर्ती ठेवली. त्याच्या  घराच्या गणपतीला वेगवेगळ्या धर्मांचे आणि वेगवेगळ्या देशातून आलेले भारतीय आणि अभारतीय तेवढ्याच उत्साहाने सामील होतात. जणू काही टोरोंटो च्या  संस्कृतीचं एक प्रतीकच. डीन च्या शब्दात सांगायचं तर गणेशोत्सव साजरा करतांना घरी भेट दिल्याचं समाधान मिळतं.

जाता जाता गोखले मावशींनी मला एक खूप महत्वाचा संदेश दिला. बाप्पाचं विसर्जन आपल्याला लेट गो करायला शिकवतं. गोष्टी धरून न ठेवता, त्यांना बांधून न ठेवता जाऊ देणे आणि पुढच्या वर्षी नव्या दमाने निर्मिती करणे हीच तर या सणाची शिकवणूक आहे.

सुबोध भावे म्हणतात तसं तुमचं पुण्यस्मरण करणारी आमची पिढी शेवटची असेलही कदाचित. पण तुमच्या कार्यरूपाने, येणाऱ्या अनेक पिढ्या तुम्ही आमच्यात असाल. आणि शब्दांत मांडू शकलो नाही तरी आम्ही सगळेच यासाठी तुमचे कायम ऋणी राहू.

कळावे. लोभ असावा.

आपली विनम्र,

गायत्री

# Mirror… Mirror…..on the wall

## — Gayatri Gadre

Kritika arrived home past midnight. A surprise gift and a greeting card were waiting for her on the table.

"Some kids are born lucky,

they get the best mom in the world,

and I am the luckiest,

as you are mine

To the best mom in the world

Happy Mother's Day

Love you so much!!

Parnika

She was filled with joy with a tinge of guilt. She had been working for 15 hours every day for the past 2 weeks, without a single day off. She had hardly spent any time with Parnika. She went to Parnika's room but she was fast asleep. Kritika kissed her on her forehead and excitedly went to the mirror room.

“Mirror… mirror…. on the wall….. am I not the happiest person of them all?” she asked the mirror while showing it her greeting card and gift.

“No,” the mirror said “Meera is the happiest of them all. Her husband gifted her a brand new Mercedes on her birthday. Look at her”. The mirror showed her Meera posing with her black Mercedes.

~*~*~*~*~*~*~*~

Meera showed her shiny new Mercedes and asked the mirror

“Mirror… mirror…. on the wall….. am I not the happiest person of them all?”

“No,” the mirror said “Your brother Mihir is. He just won the ‘Businessman of the year’ award. Look at him”. The mirror showed her Mihir posing with his award; his wife and his two beautiful children standing next to him.

~*~*~*~*~*~*~*~

Mihir showed his award and asked the mirror

“Mirror… mirror…. on the wall….. am I not the happiest person of them all?”

“No,” the mirror said “Suraj is. He just completed his African safari and got a dedicated show on the National Geographic”. The mirror showed him the trailer of Suraj's Nat Geo show starting next month.

~*~*~*~*~*~*~*~

Suraj showed his new show's trailer and asked the mirror

“Mirror… mirror…. on the wall….. am I not the happiest person of them all?”

“No,” the mirror said “Your brother Chintan is. He just got engaged. Look at him.” The mirror showed him Chintan's engagement photographs, with his parents standing next to him, their eyes filled with pride.

~*~*~*~*~*~*~*~

Next morning Chintan arrived at office and found out that he had lost his job. He couldn't bear the thought of telling the news to his parents. How could he lose his job? He was the gold medalist from the best university, best employee for three years in a row, the only one to get promoted even

during recession. What will Reena think of him? What will her parents say?

~*~*~*~*~*~*~*~

Suraj emptied his fifth peg and looked at his mobile phone's screen. Richa got married. She didn't give much explanation except for "He is well settled, owns a house and can afford a honeymoon in Europe". He ordered his sixth peg.

~*~*~*~*~*~*~*~

Mihir looked at the sleeping pillin his hand "Will one be enough or shall I take two?" he thought. He hadn't been able to sleep for over a month. Just as he lifted a glass of water to gulp the pill, a terrible pain shot from his left arm to the chest and he fell to the floor.

~*~*~*~*~*~*~*~

"Did you receive your gift?" Ajay asked Meera on the phone. "Yes, thank you. Aren't you coming?" she asked hopefully. "No, the sudden policy changes have opened some new opportunities that didn't exist before. I won't be able to come for another 6 months" he said. Losing hope in her voice she asked hesitatingly "Did you think about what I said?" "Meera, we have discussed it a hundred times. I can't just wrap up everything and come there. And we had decided that we can't let our kids grow up in western culture. We want them to have Indian values. It is only a matter of few more years. Once kids go to college you are free to either join me here or start your own business"

Half an hour later, Meera got down from her brand new Mercedes in front of her Psychiatrist's.

~*~*~*~*~*~*~*~

Kritika woke up with a hangover of the guilt from previous night.

"Today" she promised herself once again and switched her laptop on. She was halfway through when Parnika shouted "Mamma….. I have to go early today, we have tennis practice"

She got up quickly and started preparing the breakfast. While waiting for the upma to cook, she picked up her phone. She hadn't checked her WhatsApp in last two days. There were 178 new messages on the parents' group. "Oh my god, did I miss something?" she quickly scrolled through the messages.

There was a message from Parnika's class teacher about the educational trip to NASA & Rs. 2,00,000 to be deposited by the end of the month followed by messages with shopping lists, brand recommendations by various parents in the group.

"Mamma I want my own mobile phone for the NASA trip. I don't like you calling on my friends' numbers," Parnika said while putting her hands around Kritika's. "There is this cool new phone Kinnari has got ………" Parnika's voice trailed away as Kritika sat staring at the half written resignation letter on her laptop screen.

An hour later Kritika increased her speed glancing at her watch, dreading her boss' reaction as she was half an hour late. As she neared the building she saw an ambulance surrounded by large crowd. "What happened?" she asked Mitali standing in the crowd.

"Chintan committed suicide. He jumped off the top floor" somebody replied.

Mirror smiled with satisfaction and patiently waited for its next victim.

~*~*~*~*~*~*~*~

# ।। दास-वाणी ।।

जयाचे अंतरीं अज्ञान ।

नाही वोळखिले सज्जन ।

तयास मायामिथ्याभान ।

सत्यचि वाटे ।।

जेणे जैसा निश्चये केला ।

तयासी तैसाचि फळला ।

पाहे तोचि दिसे बिंबला ।

तैसी माया ।।

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

दासबोध : ०८/०२/३६-३७

अहं ब्रह्मासि ।

मी ब्रह्मस्वरूप आहे हे ज्ञान होय. मी जीव आहे. मी देहरूप आहे हे अज्ञान. संत सज्जन ओळखून त्यांची सेवा केली नाही.त्यांनी घालून दिलेल्या मार्गावर चालले नाही,म्हणून त्यांना सत्याचे आकलन झाले नाही.मायिक जग आणि सृष्टीच त्या बद्ध जीवांना खरी वाटते.ही माया खरी नसते. खऱ्यासारखी भासते म्हणून मिथ्या.

साधक जसा निश्चय करतो.तो त्याला तसाच फलद्रुप होतो.तो ज्या दृष्टीने पाहील त्याला जग तसेच दिसेल.मायेचे तसेच आहे. ज्याला तीआहे असे वाटतेत्याच्यासाठी तिचे अस्तित्व आहेच आहे. मायेचा निरास करण्यासाठी मात्र अनुभवी सद्गुरूच हवा जो साधकाला सिद्ध बनवतो.सत्याची अनुभूती प्राप्त करून देतो.

सूक्ष्मआशंकानिरूपण समास.

# ।। दास-वाणी ।।

येक म्हणती कैंचा धर्म ।

अवघा होतसे अधर्म ।

ये संसारी नाना कर्म ।

करणें लागे ।।

येक म्हणती बहुतांपरी ।

वासना असावी बरी ।

येणेचि तारिजे संसारी ।

अनायासें ।।

।। जय जय रघुवीर समर्थ ।।
दासबोध : ०८/१०/०७-०८

संसाराचा पैलतीर कसा गाठावा याबद्दल मतमतांतरे आहेत. सुखाचा संसार करावा. मधे मधे दान पुण्य करावे. इतकेच पुरे. तर कोणी प्रपंच टाकून टोकाची विरक्ती घ्यावी म्हणजे मोक्ष लाभेल असे म्हणतात.ब्रह्मचर्य गृहस्थ वानप्रस्थ संन्यास या चारहीआश्रमधर्मामधे सांगितलेले नियम पाळून राहिलेतरी पुरे असे मानणारे काही आहेत.

याउलट कसला आश्रमधर्म? सगळीकडे तर अधर्मच माजलाय. या संसारात पाप पुण्याचा विचार न करता अखंड भली बुरी कामे करावीच लागतात. असेही बोलणारे लोक आहेत.

आपण बरं आपल बरं. लोकांच्या भल्यासाठी मनापासून प्रार्थना केली म्हणजे बास. तेवढयाने सुद्धा हा प्रपंच तरला जाऊ शकेल, अशीही कित्येकांची भावना असते. परमार्थ इतका सोपा असता तर प्रत्येकजण सिद्धपुरूषच बनला असता.

शून्यत्वनिरसन समास.

खग देखणा बसुनि फांदीवरी
नजर स्थिर मनी विचार करी.. ।

लगडली फळे, बहरला तरू
झाला मेजवानीचा काळ सुरू ...।

हरखला असा सुखी होय मनी
तृप्त जाहला फक्त पाहुनी...।

पाहू कोणते, खाऊ कोणते,
भुक्या जीवाला मुळी न कळे ...।

वाटते म्हणावे त्यास आता
खा मेवा  अन् द्या वनवार्ता...।

- **संध्या माईणकर**



**चित्रकार - राणी सातपुते**

## हिंदी कविता

**— मन्दाकिनी बाबरदेसाई**

मनुष्य की आढ्यतापर हँस रही है प्रकृति
सुखों के पीछे कितना भागेगा तू, कभी तो ले छुट्टी।

तू अंतरिक्ष में जाके चांद मंगल की मिट्टी लाया
इतनी सूक्ष्म करोना कि किमाया तू समझ नहीं पाया
तेरे करोड़ों के शस्त्र मिसाइल कुछ नहीं काम आया
इतने छोटे व्हायरस का तू जवाब नहीं दे पाया

हवस और दुष्टता का ऐसा हुआ धमाका
जाम हुआ चक्का दुनिया की कारें रेल विमानों का
सारी दुनिया की आज हो गई है बंदिशाला
सबके मुंह को आज लग गया है ताला।

कितनी गंदगी फैलाई है तूने सृष्टि का नियम तोड़ा।
सिर्फ धरती क्या तूने अंतरिक्ष को भी नहीं छोड़ा।
घुटन सी हो रही थी मेरी
अच्छा हुआ तूने खुद को ही पाबंदी लगाई

फैला हुआ धुआ जाकर खुला हुआ आकाश
हरे भरे पेड़ चमक उठे मिला सूरज का प्रकाश।
स
वच्छ पवित्र होकर नदिया झरने बहने लगे ।
दूर-दूर से हिमालय की शिखर दिखाई देने लगे।


समुद्र की मौजो में शुभ्र मोती चमकने लगे
मछलियां खेलने के लिए किनारे ढूंढने लगे 1
लाशों के ढेर लगाए दानवोने
लेकिन जान बचाने की कसम खाई है कर्तव्य तत्पर मानवोने


जान लेनेवालों से जान बचानेवाला ही भगवान होता है
डॉक्टर नर्सेस पुलिस और सब कर्मचारी यह सब ही हमारे भगवान है
इन सबको हमारा प्रणाम है। इन सबको हमारा प्रणाम है।

———xxxxx——

## चित्रकार- रोहित वडके








## चित्रकार- रोहित वडके





# चित्रकार- रोहित वडके







# अनुप घोलप यांच्या कविता

## शेवटचा श्वास....

मिटले डोळे अलगद दोन्ही
विरून गेली जगण्याची आस
जग वेगळे दिसले मला
घेताना तो शेवटचा श्वास

आपली माणसे भोवती होती
आसवांची सोबत होती
पाहून त्यांना झाला मला
जगून गेल्याचा आभास
जग वेगळे दिसले मला
घेताना तो शेवटचा श्वास

आठवणींचे सजणे होते
वेदनांचे कण्हणे होते
अशा जगून गेल्या जीवनाचा
संपला आता प्रवास
जग वेगळे दिसले मला
घेताना तो शेवटचा श्वास

निरोप घेतला देहाचा या
शोधीत निघालो देवाला त्या
हीच आशा एक आहे
मिळेल गती त्या चरणास
जग वेगळे दिसले मला
घेताना तो शेवटचा श्वास...

————XXXXX————

## गाठोडे...

सांजेच्या एका सोनेरी क्षणी
कोठून वादळ गोंगावत आले
सूसाट वाऱ्यात त्या माझे
गाठोडे  स्मृतिंचे हरवून गेले

होते त्यात काही विचार मनाचे खुळे
शब्दांची पाने अन ओळींची फुले
मुकी असुनी ती भावना झुले
रमताना तयात भान ना उरे

चाहूल वाऱ्याची जेव्हा मिळे
गाठोडे घट्ट माझ्याशी जुळे
सदा सोबतीचे स्वप्न ते खुळे
काळा चे चक्र आम्हा ना कळे

हरवले जरी आता ते गाठोडे
मोकळया स्मृति हवेला मिळे
स्पर्श त्यांचा नसेल जरी
स्मृती सुगंध सदा दरवळे

————XXXXX————

## थोडा गौर कर...

कितने है शक-ए-काबिलियत
गलतीयां दिखाने हर कोई खडा है
आख बंद जरा गौर कर
बेमीसाल तू बडा है....

मंजिलोकी उचाई से न डर
नीचे खुदा भी इंसान बना है
उड़ान भर ले पंखो मे बस
नीचे तेरे आसमा रुका है

रिश्तोंकी होती तसबीरे कई
कुछ सच्ची तो कुछ फरेब
संभल के रखना उन्हीको
जिनमे तेरा चेहरा दिखा है....

————XXXXX————

## कुछ नए लब्ज़..

हजारों कोशिशों की
अब हार मान लूं
नसीब ही थोड़ा
उधार मांग लूं
धूप में चला जो
छांव आनी चाहि
पेड़ ना दिखा तो
अंधेरा मांग लूं
सपनों से ही बनी
ये ज़िन्दगी जो यहां
वो पूरे ना हुए तो
थोड़ीसी नींद मांग लूं

————XXXXX————

# बाल कलादालन

चित्रकार- यश परब (वय वर्षे ८) -एल्म ड्राईव्ह पब्लिक स्कूल






# बाल कलादालन

चित्रकार - यश परब ( वय वर्षे ८) - एल्म ड्राईव्ह पब्लिक स्कूल






चित्रकार- आरोही गाडगीळ ( वय वर्षे 11) - एल्म ड्राईव्ह पब्लिक स्कूल





चित्रकार- आरोही गाडगीळ ( वय वर्षे 11) - एल्म ड्राईव्ह पब्लिक स्कूल



